http://www.sgbauonline.com/



# M.A. (Part-I) Marathi (Semester-I) Examination

## MARATHI (Optional Paper)

## Paper—3(C)

## (Loksahitya)

वेळ—तीन तास] [एकूण गुण—80

**सूचना :**—(1) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

(2) वस्तुनिष्ठ प्रश्नांची उत्तरे एकापेक्षा अधिक वेळा लिहिल्यास मूल्यांकनासाठी पहिले उत्तर ग्राह्य धरण्यात येईल.

1. लोकसाहित्याबद्दलच्या विविध अभ्यासकांच्या व्याख्या स्पष्ट करून लोकसाहित्याचे स्वरूप तुमच्या शब्दात लिहा.

**किंवा**

लोकसाहित्याचे संप्रदाय सांगून भाषाशास्त्रीय संप्रदायाचे सविस्तर विवेचन करा.

2. लोककथांची व्याख्या स्पष्ट करून अद्भुत कथेविषयी सविस्तर लिहा.

**किंवा**

'व्रतकथा व चातुर्यकथांद्वारा लोकधर्मीय जाणीव अभिव्यक्त होते.' या विधानाचा परामर्श घ्या.

3. लोकगीतांचे वर्गीकरण करून स्त्रियांच्या सण-उत्सवाच्या गाण्यांचे सविस्तर विवेचन करा.

**किंवा**

'ओवीगीते, स्त्री मनाच्या अंतरीच्या ओलाव्याने ओथंबली आहेत.' या विधानाची सोदाहरण चिकित्सा करा.

4. लोकरंग भूमीचे स्वरूप स्पष्ट करा.

**किंवा**

लोक संस्कृतीच्या उपासकांविषयी सविस्तर माहिती द्या.

5. खालील वस्तुनिष्ठ प्रश्नांचे योग्य पर्याय निवडून उत्तर लिहा (उदा. प्रश्न क्र. 1 (ड) लोकमान्य टिळक) :

(1) दुर्गा भागवत लोकसाहित्यासाठी कोणती शब्दरचना वापरतात ?

(अ) ग्रामीण गीत संगीत (ब) नवनवोन्मेषशालिनी

(क) ओवीबद्ध शब्दरचना (ड) स्त्री पुरुषांचा भावनामय आविष्कार

(2) "लोक कथागीत है गायनानुकूल असते" असे कुणी म्हटले आहे ?

(अ) डॉ. रा.चिं. ढेरे (ब) डॉ. एफ.बी. गुमेर

(क) डॉ. शरद व्यवहारे (ड) डॉ. दिनकर कुळकर्णी



http://www.sgbauonline.com/

http://www.sgbauonline.com/

(3) 'लोकसाहित्याची संशोधन पद्धती' या पुस्तकाचे लेखक कोण ?

(अ) डॉ. डी.डी. कोसंबी | (ब) डॉ. अनिल सहस्रबुद्धे

(क) डॉ. राजेंद्र हावरे | (ड) डॉ. संजय लोहकरे

(4) आदिवासी लोकसाहित्यामध्ये आलेली 'पेन' ही संज्ञा कुणासाठी आहे ?

(अ) बिरसा मुंडा | (ब) पार्वती देवी

(क) महादेव | (ड) इंद्रदेव

(5) खालीलपैकी कोण क्षेत्रपाक देव-देवता नाही ?

(अ) खंडोबा | (ब) ज्योतिबा

(क) बिरूबा | (ड) महदंबा

(6) 'लोकसाहित्य : आकलन आणि आस्वाद' हे पुस्तक कुणी लिहिले आहे ?

(अ) डॉ. शंकर राऊत | (ब) डॉ. मधुकर वाकोडे

(क) डॉ संजय लोहकरे | (ड) डॉ. सरोजिनी बाबर

(7) खालीलपैकी कोण उपासक भटकंती करत फिरत नाही ?

(अ) बहुरूपी | (ब) पांगुळ

(क) कुडमुड्या-जोशी | (ड) भगत

(8) उखाण्यांचा वापर प्रामुख्याने कुठे होतो ?

(अ) रोजच्या वापरात | (ब) प्रसंगानुरूप

(क) बैठकांमध्ये | (ड) लग्न कार्यात



http://www.sgbauonline.com/